# सीमेवरील नोंदी : मुंबई महानगर प्रदेशावरील एक छोटे टिपण

— सुधा मोहन

जागतिकीकरणाचे वास्तव, बदलत्या कारभारपध्दती आणि राजकारणासमोरची आव्हाने ह्यामुळे प्रशासनव्यवस्थेबाबत नेहमीच्या औपचारिक संवादाच्या पलिकडे जाऊन शोधणे आणि तपासून पाहाणे आपल्याला भाग पडलेले आहे. ह्या नव्या दृष्टिकोनानुसार आपल्याला अवकाश-राजकारण आणि सत्ता ह्यांच्या गति-शास्त्रात सामील व्हावे लागणार आहे. ह्या संदर्भात मुख्य शहराच्या परिसरातील शहरप्रदेशांची भूमिका राजकारणाचे उपक्षेत्र म्हणून महत्वाची ठरते आहे. त्यामुळे सर्वसाधारण कारभार म्हणजे काय ह्यातील फरक समजून घेणे आवश्यक झाले आहे. कारण हे कारभार पाहाण्याचे तीन महत्वाचे पैलू आहेत - १) अधिकार कुणाकडे आहेत? २) फायदे आणि त्यासाठी मोजावे लागणार मूल्य ह्यांचे वाटप कसे केले आहे? निर्णयप्रक्रियेत जनतेचा सहभाग किती आहे? त्यामुळे मुख्य भागातली किंवा सीमावर्ती भागातली कारभार व्यवस्था किंवा विकासकार्यक्रम हा किती काळ उपयोगी ठरेल हे समजून घेण्यासाठी ह्याच तीन गोष्टींची मदत होईल.

महानगरप्रदेश म्हणजे काय विखुरलेल्या शहरी वस्त्या बनलेल्या आहेत की काय? ह्या महानगरातील वेगवेगळ्या बेटपध्दतीमुळे आणि तेथील वेगवेगळ्या राजकीय समस्यांमुळे आसपासच्या शहरी भागांचे मार्ग जटील होणार आहेत. ह्या त्या संदर्भात पुढील प्रश्न निर्माण होऊ शकतात.

१) शहरांना त्यांची स्वतःची व्यक्तिगत ओळख असते काय ?

२) शहरे आणि त्यांच्या सभोवताली असणारे प्रदेश ह्यांची नाळ एकमेकांशी विविध बाबतील गुंतलेली असते. अशा वेळी आपण शहरे आणि भोवतालचे प्रदेश ह्यांना वेगवेगळे वागवणार का ? तसे आपण वागले पाहिजे का?

३) आपण "शहर" ही संज्ञा वापरतो त्या संज्ञेच्या कक्षेत हे सीमावर्ती भाग येतात का ?

४) जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे जग जवळ येत चालले असताना शहरे आणि परिसरातील भूभागातील संबंध हे पूर्वीपेक्षाही अधिक महत्वाचे ठरत आहेत काय ?

शहर आणि त्याला वेढणाऱ्या प्रदेशांचा एकमेकांशी संबंध, त्यांची एकमेकांवर होणारी प्रतिक्रिया आणि त्यांचे एकमेकांवर असलेले अवलंबन ह्या तीन घटकांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न ह्या छोट्याशा टिपणाद्वारे केलेला आहे.

## शहर : कल्पनेतले आणि वास्तवातले

मानवी विचार आणि कृती हयांना शहराने नेहमीच आकर्षून घेतलेले आहे. शहर ही अशी जागा आहे जिथे सामान्य माणसे यशस्वी आयुष्य जगण्याची आणि व्यवस्थित जीवनमान ठेवण्याची अपेक्षा बाळगून असतात. अशा तऱ्हेने स्थलांतरितांसह

शहरवासीयांची प्रत्येक पिढी शहरामध्ये आशा, सकारात्मकता, उत्साह आणि उर्जा आणते, त्यामुळेच शहरे जिवंत आणि गतीमान होतात. शहरांमध्ये अनेक समस्या असतात तसेच शहरे अनेक संधीही उपलब्ध करून देतात हे लोकांना ठाऊक असते. अचल स्थळे, टिकाऊ निवारे, एकत्र जमण्यासाठी कायमच्या सुविधा, एकमेकांमध्ये बदलून घेण्यासाठी आणि साठवून ठेवण्यासाठी जागा, आवश्यक सामाजिक साधने आणि कष्टाची सामाजिक विभागणी ह्या सर्व गोष्टी म्हणजे एखाद्या शहराच्या अस्तित्वाची आवश्यक भौतिक परिमाणे असतात. त्यामुळे केवळ आर्थिक जीवनच सुखकर होत नाही तर त्यासोबत सांस्कृतिक प्रक्रियाही साधली जाते. मुंबईनेही ही सर्व कार्ये पूर्ण केली आणि आज हे शहर म्हणजे महाराष्ट्रातील कळसाचे केंद्रस्थान बनले आहे.

लोकसंख्यावाढ किती होऊ शकेल ह्याच दृष्टिकोनातून वसाहतींनंतरच्या काळात शहरांकडे पाहिलं गेलं. शहरी सिध्दांतांच्या पाठिराख्यांनी हा दृष्टिकोन वेगवेगळ्या मार्गांनी सांगितला आहे. पण तरी त्या सर्वाचे एकमेव सार हेच आहे की शहरे वाढली आहेत. तिथे लोकसंख्येचा स्फोट होईल की काय असा प्रकार आहे. ही वाढ होताना सामाजिक आणि भौतिक पायाभूत सुविधांमध्ये मात्र त्या प्रमाणात वाढ झालेली नाही. उदाहरणार्थ, विकसनशील देशांतील महानगरांमधील शहरीकरणाच्या सामाजिक आणि आर्थिक समस्यांचे वर्णन करताना "खोटे शहरीकरण" "अतीवेगवान शहरीकरण" आणि 'उतू जाईल असे शहरीकरण' अशा संकल्पना वापरल्या जातात. त्यातून हेच सूचित करायचे असते की शहरीकरण जरी झालेले असले तरी त्यासोबत योग्य तऱ्हेचा आर्थिक किंवा सामाजिक विकास मात्र झालेला नाही. ह्या देशांमध्ये असे झाले आहे की शहरांमधील वाढीचा दर वाढल्यामुळे शहरी प्रदेशात वाढ झाली आणि शहरी लोकसंख्याही मुंबईसारख्या काही थोड्याच शहरांमध्ये एकवटली गेली. त्यामुळे शहरीकरणाची समस्या अधिकच तीव्र बनली. त्याचा परिणाम म्हणून भारतातील शहरी केंद्रे अस्ताव्यस्त मानवी व्यवहारांची गोंधळयुक्त जाळीच बनली त्यामुळे शहरी कारभारयंत्रणेतही अडचणी येऊ लागल्या.

भारतातील बहुतेक महानगरे वळचणीने वाढत आहेत. जनगणनेतील संकल्पने प्रमाणे "शहरी समूह" असेच त्यांना म्हणावे लागेल. सतत होणारा शहरी विस्तार ही संकल्पना व्यक्त करते. एखादे छोटे किंवा मोठे शहर आणि त्या शहरालगतची वाढ ही ह्या संकल्पनेच्या व्याप्तीत येते. २००१ साली १० लक्षांहून अधिक लोकसंख्या असलेल्या ३५ मोठ्या शहरांमधील जयपूर, लुधियाना आणि फरिदाबाद ह्या फक्त तीनच शहरांत अशा तऱ्हेची शहरालगतच्या भागातली वाढ दिसून आली नव्हती. तथापि आपल्यापाशी असलेली बहुतेक माहिती संख्याशास्त्रीय, अंतराळातून गोळा केलेली किंवा वर्णनात्मक असल्याने शहरातील प्रत्यक्ष देखाव्याचे गुंतागुंतीचे, बहुपेडी आणि सतत बदलते स्वरूप काय आहे त्याचे प्रतिनिधीत्व करण्यात ती महिती कमी पडते. मुंबईच्या बाबतीतही ही गोष्ट खरी आहे. ही नगरीसुध्दा एकमेकांत अडकलेल्या बहुविध समाजांच्या आणि बहुविध पध्दतींच्या जटील जाळ्यात गुंतलेली आहे. म्हणून मग अंतराळातून जमवलेली किंवा संख्याशास्त्रीय आणि राजकीय-व्यवस्थापनीय परिमाण लाभलेली तांत्रिक माहितीच आपण लक्षात घेतली तर जीवनाचे खरे वास्तव काय आहे ते समजावून सांगणे खरोखरच अवघड आहे. खरे सांगायचे तर शहरात एक नव्हे तर अनेक गुंतागुंताच्या वास्तवता एकाच वेळी नांदत असतात. त्या एकमेकींपासून खूप दूर आणि कधीकधी तर एकमेकींच्या अगदी विरूध्द असल्यासारख्या

भासतात. असे असूनही सामाजिक, राजकीय आणि अवकाशयुक्त क्षेत्रातील त्यांचे वेगवेगळया थरांचे नाते एकमेकींवर अवलंबून असते आणि एकमेकींत सखोलपणे गुंतलेलेही असते. अशा तऱ्हेने मुंबई आणि तिच्या परिसरातील नातेसंबधसुध्दा एका बाजूला झुकलेले, असमान, वेगवेगळ्या पातळीतले, संधीसाधूपणाचे आणि अतर्क्य राहिलेले आहेत.

गॉटमन (१९६१) ह्यांनी 'मेगालोपॉलीज' अशी संकल्पना मांडली. बोस्टन ते वॉशिंग्टन ह्यामधील पट्टयात जो नवा आर्थिक प्रदेश उदयास येत होता, त्याचे वर्णन करताना त्यांनी वरील शब्द वापरला. हा शब्द मूळ ग्रीक शब्दापासून उगम पावलेला असून त्याचा अर्थ खूप मोठे शहर असा आहे. हा शब्द नंतर इतर अनेक ठिकाणीही वापरला गेला. ओहमे (१९९३) ह्यांनी नंतर असे प्रतिपादन केले की जागतिक अर्थव्यवस्थेतील आर्थिक एककांची सोय करताना प्रादेशिक राज्यांनी नंतर राष्ट्रीय राज्यांची जागा घेतली. मेगा-रिजन किंवा आर्थिक महाप्रदेश म्हणजे काही एखादे राष्ट्र किंवा त्यातील प्रांत ह्यांच्यासारखा कृत्रिम राजकीय सीमांनी निर्मिलेला भाग नसतो तर संशोधन, उत्पादन आणि ग्राहक बाजार ज्या ठिकाणी एकवटलेले आहेत अशा केंद्रातून हे मेगा-रिजन उत्पन्न होतात.

## मुंबई आणि मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन

मुंबई हे भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर आहे. तसेच तो जगातील सहावा महानगरीय प्रदेश आहे. येथील लोकसमूह अत्यंत गुंतागुंतीचा आहे. मागील दोन शतके ह्या बेटावरल्या शहराने अनेकदा कात टाकली. साम्राज्यवादी युगापासून स्वतंत्रतेच्या युगापर्यंत, औद्योगिक शहरापासून विना-औद्योगिक शहरापर्यंत आणि स्थानिक - प्रादेशिकतेपासून राष्ट्रीय - जागतिकता इथपर्यंत ह्या शहराचा प्रवास झाला. तो प्रवास करताना एक सामाजिक - अवकाशयुक्त रचना येथील लोकसमूहाने दाखवली ती म्हणजे गुंतागुंतीच्या रचनेचे एक उदाहरणच आहे. मुंबई हे एक विरोधाभासांचे शहर आहे. ह्या शहराच्या सीमेत कुठल्याही शहराला आणि तेथील नागरिकांना वेदनामय होतील अशा काही वाईट गोष्टी आहेत तसेच गतीशीलता आणि लवचिकता हे प्रेरणादायी स्त्रोतही आहेत. खरे सांगयचे तर सध्याच्या मुंबईत कित्येक समांतर शहरे नांदत आहेत. हे अगदी पाहाण्यासारखे दृश्य आहे.

कित्येक दशके मुंबईची व्यवस्था अनेकविध संस्थांनी पाहिली. दृष्टिकोनातील आणि कार्यपध्दतीतील आडमुठेपणा, वेगवेगळ्या संस्थांमधील समन्वयाचा अभाव, अकार्यक्षमता ह्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाला भूतकाळात बरेचदा बाधा आली. भ्रष्टाचाराचे अस्तित्व तर जवळजवळ सर्वच मूलभूत सेवांमध्ये जाणवण्यासारखे होते. खालील तक्ता आपल्याला दर्शवतो की जर आपल्याला समतोल साधलेला विकास हवा असेल तर त्यासाठी मागासलेल्या भागांचा विकास करताना व्यवस्थित समन्वय साधण्याची गरज होती परंतु कुणीही निष्ठापूर्वक ते काम केले नाही.

मुंबई महानगर प्रदेशात अत्यंत दुर्लक्षित प्रदेश जर कुठले असतील तर म्हणजे जे भौगोलिक आणि इतरदृष्ट्या उंबरठ्यावर उभे आहेत. असे प्रदेश होत.

१९७३ साली मुंबई महानगर प्रदेशासाठी पहिली योजना बनवण्यात आली. परंतु एवढी वर्षे उलटूनही मुंबई शहर, तेथील उपनगरे किंवा त्यापुढील विस्तारित भाग ह्यांचा चांगल्या तऱ्हेने विकास झाला नाही हे सत्य शिल्लक राहातेच.

ह्या ठिकाणी स्पष्ट उल्लेख करणे गरजेचे आहे की मुंबई महानगर प्रदेशाच्या १९९६-२०११ ह्या काळातील योजनेत स्पष्ट म्हटले आहे की 'ही योजना आखून वीस वर्षे उलटून गेली तरी बृहन्मुंबई शहर अजूनही लोकसंख्येचा भार, वाईट पायाभूत सुविधा आणि पर्यावरणीय प्रदूषणाचे ओझे ह्यांच्याखाली दबलेलीच आहे.' मुंबई शहराच्या अनेक समस्या आहेतच पण त्याशिवाय ह्या शहराच्या आसपासच्या भागातील वैशिष्ट्यपूर्ण समस्या आणि तेथील विकासासाठी उचलण्याची पावले ह्यांच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आले आहे. (टाटा समाजशास्त्र संस्था आणि युवा ह्यांचा अहवाल १९९६) ह्यांत म्हटले आहे की तथाकथित गावठाण भाग म्हणून मुंबई महानगर प्रदेशाचा (मुंबई मेट्रॉपॉलिटन रिजनचा) जो भाग ओळखला जातो तो साधारण ६०% आहे. तेथे प्रादेशिक लोकसंख्या केवळ ६% असून शहरात जी विकास कामे केली जात आहेत ह्या भागात फारशी पोचलेली नाहीत.

| संघटना / पातळी | कृतीकर्ते / संस्था | विभागीय नाते | भूमिका |
|---|---|---|---|
| केंद्र सरकार | शहरी विकास खाते<br>नियोजन आयोग | सर्वसमावेशक<br>शहरी विकास | शहरीकरणविषयक ध्येयांचे धोरण आणि कृतीत रूपांतर आणि त्यांच्या अंमलबजावणीवर देखरेख |
| राज्य सरकार | शहरी विकास | शहरी विकास हे राज्याचे धोरण म्हणून प्रत्यक्ष विकास | राज्यातील शहरी विकासाचे थेट व्यवस्थापन आणि नियोजन |
| वैधानिक प्राधिकरणे | | | |
| अ) पाणी | एमएमआरडीए<br>एमडब्ल्यूएसएसबी | महानगरांचे नियोजन<br>पाणी पुरवठा आणि सांडपाण्याचे नियोजन | स्थानिक आणि प्रादेशिक पातळीवरील विकासाच्या आणि पाणीवाटपाच्या योजना बनवणे |
| ब) घरबांधणी | • म्हाडा<br>• सिडको | गरीब / निम्न मध्यमवर्गी शहरी लोकसंख्या | समाजिक घरबांधणी / परवडू शकेल अशी निवास व्यवस्था |
| क) आरोग्य | • महापालिका रूग्णालय<br>• खाजगी दवाखाने<br>• सुपर स्पेशालिटी रूग्णालये | गरीब /निम्न मध्यम वर्ग<br>उच्च मध्यमवर्ग आणि श्रीमंत वर्ग<br>निवासी आणि अनिवासी श्रीमंत वर्ग | फुकट / सवलतीच्या दरात आरोग्य सेवा<br>तातडीची आणि चांगल्या गुणवत्तेची आरोग्यसेवा<br>अत्याधुनिक आणि उच्च किंमतीची आरोग्यसेवा |
| ड) वाहतुक | • एमएसआरडीसी<br>रेल्वे (केंद्र सरकार) | रस्ते विकास बहुसंख्य प्रवाश्यांची सोय | सार्वजनिक आणि खाजगी वाहतुकीची सोय रेल्वे सेवा |



चित्र १



चित्र २

त्यामुळे मुंबई शहरातील मूलभूत सामाजिक आणि भौतिक सुखसुविधांपासून हा भाग कित्येक योजने दूर आहे. महानगर प्रदेशाच्या इतर भागांप्रमाणेच ह्या भागाचाही विकास व्हावा ह्यासाठी खास प्रयत्न केले गेले पाहिजेत. शहराभिमुख रोजगार आणि सुखसोयी आणि व्यवस्था करताना येथील नागरिकांच्या सहभागाला पोषक अशी परिस्थिती आपण निर्माण करायला हवी.

बृहन्मुंबई म्हणजे मुख्य शहर केवल ४३८ किमी जागेवर वसलेले आहे आणि तरीही बृहन्मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेश ह्या दोन्हींमध्ये गल्लत केली जाते. मुंबई महानगर प्रदेश हा भाग बृहन्मुंबईपेक्षा १० पट मोठा (४३३५ किमी) आहे आणि त्यात खूप दूर असलेले कल्याण आणि ठाणे असेही भाग आहेत. ह्या दोन्ही शहरांमधील लोकसंख्या १० लक्षाहून अधिक असून तीही मोठी शहरेच आहेत. (चित्र १ आणि २). एमएमआरडीए ह्या संस्थेकडे मुंबई महानगर प्रदेशामध्ये मूलभूत नागरी सुविधांचे नियोजन आणि विकास करण्याचे काम सोपवले आहे आणि तो प्रदेश ४३५५ किमी एवढा विस्तृत आहे. त्यापैकी ४६८ चौ.किमी. भाग बृहन्मुंबई शहरात येतो. मुंबई महानगर प्रदेशातील इतर भागात ५ महानगर पालिका, १५ महापालिका आणि अनेक खेडी येतात. वॉशिंग्टन-स्थित-पॉप्युलेशन ह्या संस्थेच्या आढाव्यानुसार, २०२० साली मुंबई महानगर प्रदेश हा भाग जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा भाग असेल (लोकसंख्या २८.५ दशलक्ष त्यामागोमाग टोकियो (२७.३ दशलक्ष) असेल. मुंबई महानगर प्रदेशातील सर्व संस्थांच्या कामकाजाचे नियमन करणारी आणि त्यावर देखरेख ठेवणारी एमएमआरडीए ही सर्वोच्च संस्था आहे. बेटशहर आणि तेथील परिसराचे नियोजन आणि देखरेख ठेवण्याचे कामही हीच संस्था करते. राज्याच्या लोकसंख्येच्या २२% लोकसंख्या मुंबई महानगर प्रदेशात आहे. येथील वाढीचा दर ४०- आहे, राज्याच्या दरडोई उत्पन्नाच्या दुप्पट उत्पन्न हया भागातील लोकांचे आहे, तसेच राज्याच्या करांपैकी ७०% कर आणि ७४% विक्री कर ह्या भागातूनच येत असल्यामुळे त्यास महत्व आले. म्हणूनच ह्या मोठ्या प्रदेशाला नवा आणि विस्तृत असा आर्थिक नकाशा लाभतो आहे. इथेच राजकीय रणभूमी आहे, सांस्कृतिक परिवर्तन आहे आणि अवकाशातून आलेली वैश्विक स्पर्धाही आहे. रिचर्ड फ्लोरिडा 'द ग्रेट रिसेट' (२०१०) हया आपल्या नव्या पुस्तकातून तीन शब्दांविषयी बोलतात ते शब्द म्हणजे विशिष्ट क्षमता, तंत्रज्ञान आणि चिकाटी ह्या तीन शब्दांमध्ये 'प्रादेशिक संपदा' ह्या आणखी



चित्र ३



चित्र ४

एका शब्दाची भर घालायला हवी विषयही नक्कीच इतिहासजमा झालेला नाही. प्रादेशिक संपदा म्हणजे त्या समाजाची आणि तेथील साधनसंपत्तीची अंगभूत जडणघडण. रिचर्ड फ्लोरिडांची सगळी मते जुळत नसली तरी हा नवा पैलू मात्र मला मान्य आहे.

नव्या मुक्त अर्थव्यवस्थेमुळे आणि जागतिकीकरणामुळे शहरे आणि शहरांच्या आसपासच्या परिसरांवर कसे नकारात्मक परिणाम झाले ह्याचे विस्तृत विश्लेषण शहरीकरणविषयक विद्वांनानी केलेले आहे. १९९० च्या दशकापासून जमीनवापरात बदल घडत असून शेतजमिनीचा वापर निवासी आणि औद्योगिक/व्यापारी उपयोगासाठी केला जाऊ लागला आहे. (चित्रे ३ आणि ४). जंगलांचा विनाश, भूजलसाठ्यात घट, प्रदूषण, खनिजसंपत्तीचे अती उत्खनन केल्याने झालेले जमिनीचे सपाटीकरण, वीटभट्टयांमुळे आणि घन आणि द्रव कचऱ्यामुळे जमिनीचा बिघडलेला पोत असे अनेक परिणाम नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापरातल्या बदलांमुळे आपल्याला दिसून येतात. (चित्रे ५ आणि ६)

अशा टोकाच्या बदलांचे परिणाम म्हणून पुढील गोष्टी दिसतात.

• विभक्ततेचे नवे प्रकार
• टोकाच्या भूमिका घेणे
• सामाजिक - अवकाशयुक्त तडे जाणे त्यामागील कारणे म्हणजे
• राजकीय आणि धोरणात्मक कृती जाणूनबुजून



चित्र ५



चित्र ६

आणि पूर्वनियोजित पध्दतीने करणे नियमांची आणि नियंत्रणांची बेधडक पायमल्ली करणे

वरील सर्व विद्वानांनी मुंबईच्या शहरविकासप्रक्रियेची दिशा ठरवणाऱ्या सैद्धांतिक आणि राजकीय कळीच्या मुद्दयांवर आवाज उठवला आहे. त्यासाठी त्यांनी एमएमआरडीएच्या आराखड्याचा, एमएमआरडीएने घेतलेल्या पुढाकाराचा आणि केलेल्या प्रयत्नांचा आधार घेतला आणि त्यातूनच हल्लीच्या शहरीकरणाबद्दल विवेचन करण्याचा प्रयत्न केला. (स्वप्ना बॅनर्जी-गुहा २००२ आणि वेरोनिका डूपॉण्ट २००७)

शहरासंबंधी अगदी हल्लीच आखलेले जे आराखडे आहेत, त्यात गृहीत धरलेले आहे की मुंबई महानगर प्रदेशातील एकुण लोकसंख्या २०३१ पर्यंत ३४ दशलक्षापर्यंत वाढेल. २५ वर्षाच्या आत आणखी १२ दशलक्ष लोकांना शहरप्रदेशातून प्रवास करावा लागेल. महानगरप्रदेशात जी खेडी अंतर्भूत आहेत. त्या खेड्यांतील लोकांचे जीवन आणि जीवनमान सुधारण्यासाठी जे घटक आवश्यक आहेत त्यांचे सुनियोजन करण्यासाठी धोरण आखण्याची गरज अगदी स्पष्ट दिसते आहे. त्या साठी ह्या भागातील महत्वाच्या आणि केवळ हयाच भागात होऊ शकणाऱ्या अशा लघु उद्योगांना आणि हस्तकलाउद्योगांना वाव दिला पाहिजे त्यायोगे ह्या भागातील रोजगाराच्या संधी वाढतील. उदाहरणार्थ, पेण येथील पापड बनवण्याचा आणि मातीच्या वस्तू घडवण्याचा उद्योग (पहा चित्र ७ आणि ८). हे सर्व व्यवसाय बहुतकरून अजूनही अविकसित रूपातच आहेत. त्या व्यवसायांचे नियमन करून त्यांना बळकटी आणण्यासाठी आणि बनवलेल्या उत्पादनाचा साठा करण्यासाठी त्यांना मूलभूत तंत्रज्ञान पुरवण्याची गरज आहे. ते काम सरकारी आणि गैरसरकारी संस्थांच्या माध्यमातून होऊ शकते. (मी स्वतः जेव्हा ह्या भागाला भेट द्यायला गेले होते तेव्हा तिथे काम करणाऱ्या लोकांनी माझ्याशी बोलताना मला हे विचार सांगितले.)

शहर आणि शहरप्रदेश ह्यांच्यात प्रतिकात्मक नाते असते. जर त्या दोघांतील नाते नीट समजून घेतले आणि जोपासले तर दोघेही प्रगतीच्या मार्गाने चालू लागतात. पण तसे घडले नाही तर शहराची अंदाधुंद वाढ होते, मग शहरप्रदेशातील नैसर्गिक संपदेला धोका पोचतो. त्यामुळे जी आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय किंमत चुकवावी लागते ती शेवटी त्या भागाच्या विकासाच्या दृष्टीने मारक ठरते.

मुंबई महानगरप्रदेशासमोरील मुख्य मुद्दे आणि चिंता महानगर प्रदेशातील बऱ्याच भागांना प्रस्तुत



चित्र ७



चित्र ८

संशोधिकेने भेटी दिल्या तिथे असे दिसून आले की समस्या आहे ती साधनांच्या अपुऱ्या उपलब्धीची आणि वेगवेगळ्या संस्थांच्या कामातील समन्वयाच्या अभावाची. उदाहरणार्थ, पनवेल क्षेत्रात मी काम केले आणि तेथील पत्रकार, अभियंते, पालिका समन्वयक आणि सर्वसामान्य स्त्रिया आणि पुरूष ह्यांच्या मुलाखती घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. तेव्हा प्रत्येकाच्या सुरात पनवेलचा जुना वैभवी वारसा आपण गमावत आहोत ह्याची हळहळ दिसून येत होती. पूर्वी त्या ठिकाणी राहाण्यासाठी भरपूर संख्येने वाडे होते. (चित्र ९ आणि १०) ह्यातील बहुतेक वाडे आता पुनर्विकासासाठी गेले आहेत आणि तेथे उंच मनोरे येत आहेत. त्यामुळे पनवेलमध्ये आता खूपच कमी वाडे शिल्लक राहिले आहेत. मी ज्या दोन वाड्यांना भेटी दिल्या त्यातील बापट वाडा हा ३०० वर्षे जुना वाडा आहे. एके काळचे ह्या वाड्याचे वैभव आता लयाला गेले असून तो अगदी मोडकळीला गेलेल्या अवस्थेत आहे. तिथे आजच्या घडीला ४० ते ५० कुटुंबे राहातात पण त्यातील एकालाही असे वाटत नाही की हा वाडा सांस्कृतिक वारसा म्हणून जतन व्हावा तसेच त्या वाड्याची दुरूस्ती करण्याचीही त्यांची तयारी नाही. नव्या मुक्त-विकासाच्या संकल्पनेत लोकांच्या मनोवृत्तीत शिरकाव करण्याची केवढी क्षमता आहे आणि त्यामुळे विकास म्हणजे लोकांना नक्की काय हवे आहे हे आपल्याला स्पष्ट दिसून येते. त्यांना त्या जागेचा पुनर्विकास व्हायला हवा आहे. म्हणजेच त्यांना त्या बदल्यात चांगले पैसे आणि नवीन घर बांधून हवे आहे. दुसरा वाडा आम्ही पाहिला तो होता पाटकर वाडा. तो जुन्या ठाणे-पुणे महामार्गाच्या जवळ आहे. ह्या ठिकाणी वाड्याची मूळ रचना संरक्षित ठेवण्याचा मालकांनी प्रयत्न केला आहे. परंतु त्यांनाही ह्या वाड्याची नोंदणी सांस्कृतिक वारसा म्हणून व्हायला नको आहे कारण तसे केल्याने ह्या वाड्याच्या पुनर्विकासावर आणि वापरावर निर्बंध येतील. ह्या ठिकाणी असा प्रश्न उद्भवतो की विकास म्हणजे काय हे ठरवतो कोण? जर त्या मालमत्तेच्या मालकांना वाटत असेल की अशा सांस्कृतिक वास्तूंचे जतन आणि देखरेख/संरक्षण करणे आपल्याला सरकारी सहाय्य मिळाल्याशिवाय शक्य नाही, तर त्यांना ते ठरवण्याचा हक्क असतो काय? अशा सांस्कृतिक वास्तू शोधण्याचे आणि त्यांची देखभाल आणि निगराणी राखण्याचे प्रयत्न त्याच वेळेस सरकारकडून व्हायला नकोत काय? मग त्या मालमत्तेच्या मालकांनी कुठं जायचं? प्रस्तुत संशोधिकेने हे गंभीर प्रश्न विचारले, त्यांची उत्तरे अजूनही मिळालेली नाहीत.

दुसरे म्हणजे पनवेल शहर हे तळ्यांचे शहर म्हणूनही ओळखले जाते. तथापि, कित्येक वर्षांच्या कालावधीत बांधकाम करण्यासाठी त्यातील कित्येक तळी बुजवली गेली. आज त्या प्रदेशात जेमतेम ५-६ तळी शिल्लक राहिलेली आहेत. पनवेल महापालिकेच्या अखत्यारीत जुने पनवेल हा भाग येतो. ह्या भागाच्या परिसरात पायाभूत सुविधांचे मोठमोठाले प्रकल्प होऊ घातलेले असल्याने ह्या भागावर सगळ्यात जास्त परिणाम झालेला आहे.

एमएमआरडीएला विकासाची केंद्रे म्हणून हे भाग विकसित करायचे आहेत. त्या उत्साहाच्या भरात त्यांनी बरीच कामे चालू केली आहेत. हा भाग जागतिक महानगर प्रदेश (ग्लोबल मेगासिटी रिजन) व्हावा म्हणून धडपडणाऱ्या ह्या संस्थेचे ध्येयधोरण आणि कार्यपद्धती काय आहे हे खाली दिलेली छोटीशी यादी वाचून आपल्याला समजते. ह्यात विरोधाभास असा की वेगवेगळ्या एमएमआरडीए प्रकल्पांसाठी साधनसंपत्तीच्या वाटपाच्या कामातच एमएमआरडीए गर्क झालेली आहे. एमएमआरडीने ठरवले आहे की आपण मुंबई महानगर प्रदेशात

आशियातील सर्वात मोठे 'संशोधन केंद्र' (इनोव्हेशन पार्क) उभारायचे. हा पार्क संशोधन आणि विकास ह्या क्षेत्रात सर्वात मोठा असेल. एमएमआरडीएची अपेक्षा आहे की १०० देशांतून ह्या पार्कमध्ये २५००० वैज्ञानिक येतील. एमएमआरडीए ही संस्था मुंबई महानगर प्रदेश ह्या भागातील नागरी पायाभूत सुविधांचे नियोजन आणि विकसन करते. त्या संस्थेपाशी ८.४२ कोटी रूपये नुसतेच पडून आहेत असे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांचा अहवाल सांगतो.

त्यांचे सध्या चालू असलेले प्रकल्प पुढीलप्रमाणे आहेत.

– ह्या परिसरात एक विमानतळ, एक महानगर आणि आशियातील सर्वात मोठे रेल्वेजंक्शन उभारले जात आहे. ह्यातील बहुतेक काम सिडकोने हाती घेतलेले आहे. ह्या महाकाय प्रकल्पांसाठी बरीच खेडी आणि मानवी वस्त्या विस्थापित होत असल्यामुळे ह्या प्रकल्पांना भरपूर टीका आणि विरोधांना समोर जावे लागले.

– मेगा सिटीसारख्या प्रकल्पात पुनर्वसनाच्या मुद्दयावर बऱ्याच हरकती घेण्यात आल्या कारण ह्या मेगासिटीमुळे सर्व बाजूंची खेडी विस्थापित होणार असली तरी त्यांची पुनर्वसन मेगासिटीच्या सीमाभागात छोट्या छोट्या वस्त्यांच्या रूपात सिडको करणार होती.

– विमानतळाच्या बाबतीत पर्यावरणीय मंजुरी, सी आर झेड क्षेत्राचे नियम आणि तिवरांचे क्षेत्र ह्याविषयी बरेच वादविवाद झडले.

– विकासाच्या दृष्टीने २०० एकरांचा एक सेंट्रल पार्क बनवण्याचे नियोजन केले आहे. नव्याने उदयास येणाऱ्या नगरातील हा हरित पट्टयाचा प्रदेश असेल.

– जुन्या पनवेलमध्ये विकास करण्यासाठी जागाच उपलब्ध नाही कारण जी जमीन अस्तित्वात आहे तिच्यावर आधीपासून लोक राहात आहेत ह्या मुद्दयावर अधिकारी भर देतात. ह्या परिसरातील ओल्या कचऱ्याचा काही भाग बायोगॅस संयंत्रात प्रक्रियेसाठी पाठवला जातो. तथापि, ह्या संयंत्रातून निर्माण झालेला वायू अद्यापी वापरात आणला गेलेला नाही. (अधिक माहिती साठी एमएमआरडीएची वेबसाईट पाहावी. (www.mmrdamumbai.org)

शहरी प्रदेशः मालमत्तांचे नकाशारेखन आणि लोकशाहीला बळकटी.

शहरी प्रदेशांतील दृश्य मालमत्ता अशा तऱ्हेने आपण मानवी, सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक, नैसर्गिक, पर्यावरणीय आणि शहरी अशा सात गटांत विभागू शकतो. (फ्रोडमान २००७)

ही साधनसंपत्ती अजूनही उपलब्ध आहे आणि महानगरप्रदेशात अस्तित्वात आहे. प्रश्न असा आहे की सरकारला खरोखर त्या साधनसंपत्तीची काळजी आहे का? कि 'विकास' आणि परिवर्तन ह्यांच्या नावाखाली जो नवमुक्त अर्थकारणाचा अधिकृत डाव खेळला जात आहे त्या डावाचा भाग म्हणून ह्या साधनसंपत्तीच्या जतनाकडे दुर्लक्ष करण्यात येणार आहे? ह्या सतत होणाऱ्या गुंतागुंतीच्या परिवर्तनामुळे महानगर प्रदेशाच्या प्रत्येक भागात आधीपासून असलेली मूलभूत साधनसंपदा काय आहे तिचे नकाशे व नोंदी करून ठेवणे म्हणूनच महत्वाचे झाले आहे. ह्या दृश्य साधनसंपदेचे मुख्य मुद्दे आणि गुणधर्म तपासून

पाहाणे, ही साधनसंपदा कशा तऱ्हेने वाढवली जाईल आणि मजबूत केली जाईल त्याचा नि:पक्षपाती आढावा घेणे आवश्यक आहे. मला असा विश्वास वाटतो की रेखाचित्रणाच्या केवळ ह्या एकाच कृतीमुळे हे विभाग आपल्यापाशी असलेल्या काही सांस्कृतिक किंवा पर्यावरणीय देवदत्त देणग्यांचा लाभ घेऊ शकतात.

त्याशिवाय प्राप्त परिस्थितीला सर्जनशील आणि प्रगतीशील पर्याय शोधण्यसाठी सक्रिय प्रयत्नांची माझ्या मते आता गरज आहे. वास्तविक पहाता लोकशाही तत्वाची कास धरून राजकारण केल्यास केवळ शहरीकरणाचा भर असलेल्या अधिक जागा निर्माण करण्याची आशा वाढते. मार्क प्युरसेल विधान करतात की "शहरी प्रदेशांबाबत आणि त्या प्रदेशांत चाललेल्या राजकीय आणि आर्थिक पुनर्बांधणीबद्दल आपल्याला जे काही सध्या समजते त्यात लोकशाहीचा प्रश्नही आपण गुंफला पाहिजे. तरच आपल्याला खरोखरचा सुसंस्कृत आणि योग्य तऱ्हेने राहाण्यासारखा शहरी प्रदेश मिळेल.

भूगोल, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र ह्या क्षेत्रांतील शहरी प्रदेश – अभयासकांनी शहरे आणि प्रदेश ह्यांची पुनर्बांधणी करण्याच्या प्रगतीशील कार्यक्रमाचा अधिक पुरस्कार केला पाहिजे. त्यासंबंधी एक सूचना अशी आहे की शहरी प्रदेशसमूहाचे अर्थशास्त्र हे (शहरीप्रादेशिकतावादाच्या राजकारणाप्रमाणेच) तणाव आणि हितसंबंध निर्माण करीत आहे आणि त्यांच्याभोवताली नवे संबंध आणि नवे लोंढे गोळा होत आहेत. राजकारण करण्याच्या आणि लढे लढण्याच्या जागा ह्या दृष्टीने शहरी प्रदेश महत्वाचे ठरतात. (जोनास आणि वार्ड २००७)

१९९२ साली जी ७४वी घटनादुरूस्ती झाली त्यानुसार शहरी प्रदेशांच्या काठावर असलेल्या भागांसाठी काहीतरी आशा निर्माण झाली. त्या कायद्यानुसार त्या 'रूपांतराच्या उंबरठ्यावर असलेल्या' भागांना ओळख मिळाली आणि त्यांना नगर पंचायत किंवा शहर पंचायत (मोहन २००१) असा नागरी दर्जा मिळाला. तथापि शहरी प्रदेशांच्या काठावर वसलेल्या ह्या भागांचे प्रशासन सुयोग्य चालावे ह्यासाठी ही नवीन श्रेणी निर्माण करण्याचे कार्य केंद्रीय कायद्याने वेगवेगळया राज्यांवरती टाकले. त्यात शहरी नियोजनाच्या नावाखाली सूडबुद्धीने नियोजन करून संस्था प्रभावहीन करायच्या असे केले जाण्याचा धोकाही संभावतो. (नील स्मिथ १९९६) त्याशिवाय वाढलेली तफावत, असमानता आणि कसाही केलेला अंदाधुंद विकास अशी कित्येक उदाहरणे आपल्याला भारतातील कित्येक शहरी प्रदेशांत आढळून येतात. त्यामुळे हा प्रकार बऱ्याच ठिकाणी आहे. (कुंडू ए. १९९७) मला ठामपणे वाटते की सहज सोसवेल असा विकास आणि पुढाकार घेणाऱ्या स्थानिक लोकशाहीच्या प्रश्नांकडे सातत्याने आणि गांभीर्याने लक्ष दिले तर शहरी प्रदेशांवरील अभ्यासाला फायदा होईल. विकास आणि लोकशाही ह्यांची राजकीय गतीशीलता ओळखणे महत्वाचे आहे.

शहरी प्रदेशातील निर्णय कसे घेतले जातात. ते तसे का घेतले जातात आणि ते निर्णय घेताना अधिक जबाबदारीने, अधिक प्रतिसादात्मक रितीने आणि अधिक लोकशाही पद्धतीने कसे घेतले जातील ह्यांचे अधिक गांभीर्याने परीक्षण करायला हवे आहे.

मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेश (तुलना)

| लोकसंख्या | वर्ष १९८१ | वर्ष १९९१ | वर्ष २००१ |
|---|---|---|---|
| मुंबई बेटावरील शहर | ३.२८ | ३.१७ | ३.३३ |
| मुंबई बाह्य शहर | ४.९६ | ६.७५ | ८.५९ |
| उपनगरे मुंबईबाहेरील | १.६६ | ३.४५ | ५.७९ |
| महानगर प्रदेशातील मुंबई | ९.९ | १३.३७ | १७.७ |

| लोकसंख्येचा वाटा | वर्ष १९८१ | वर्ष १९९१ | वर्ष २००१ |
|---|---|---|---|
| मुंबई बेटावरील शहर | ३३.२% | २३.७०% | १८.८% |
| मुंबई बाह्य शहर | ५०.१०% | ५०.५०% | ४८.५०% |
| उपनगरे मुंबईबाहेरील | १६.८% | २५.५०% | ३२.७०% |
| महानगर प्रदेशातील मुंबई | १००.००% | १००.००% | १००.००% |

| वाढीचा वाटा | वर्ष १९८१-१९९१ | १९९१-२००१ | १९८१-२००१ |
|---|---|---|---|
| मुंबई बेटावरील शहर | ३.२०% | ३.५०% | ०.५०% |
| मुंबई बाह्य शहर | ५१.६०% | ६४२.५०% | ४६.५०% |
| उपनगरे मुंबईबाहेरील | ५१.६०% | ५४.००% | ५२.९०% |
| महानगर प्रदेशातील मुंबई | १००.००% | १००.००% | १००.००% |

| लोकसंख्येतील बदल | वर्ष १९८१-१९९१ | १९९१-२००१ | १९८१-२००१ |
|---|---|---|---|
| मुंबई बेटावरील शहर | -०.११ | ०.१५ | ०.०४ |
| मुंबई बाह्य शहर | १.७९ | १.८४ | ३.६२ |
| उपनगरे मुंबईबाहेरील | १.७९ | २.३ | ४.१३ |
| महानगर प्रदेशातील मुंबई | ३.४७ | ४.३२ | ७.८ |

| टक्केवारीतील बदल | वर्ष १९८१-१९९१ | १९९१-२००१ | १९८१-२००१ |
|---|---|---|---|
| मुंबई बेटावरील शहर | ३.४०% | ४.८०% | १.३०% |
| मुंबई बाह्य शहर | ३६.२०% | २७.२०% | ४२.३०% |
| उपनगरे मुंबईबाहेरील | १०८.१०% | ६७.७०% | ७१.३०% |
| महानगर प्रदेशातील मुंबई | ३५.१०% | ३२.३०% | ४४.१०% |

बृहन्मुंबई मध्ये मुंबई बेट शहर आणि बाह्य शहर हे भाग येतात
स्रोत : भारत जनगणना २००१ आणि एमएमआरडीए ह्यांनी जमवलेल्या माहितीच्या आधारे